# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष २, अंक २७ ] मंगळवार, ऑक्टोबर ५, २०१०/आश्विन १३, शके १९३२ [ पृष्ठे ४, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ४१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**


**अनुक्रमणिका**



| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४.—** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. .. .. .. | १-४ |


**वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ ऑक्टोबर २०१०.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XIV OF 2010.**

AN ORDINANCE FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES ACT, 1998.

**सन २०१० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४.**

**महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

१९९९ चा महा. १०.

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०१० असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० यामध्ये कलम २२अ समाविष्ट करणे.

**२.** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम २२ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९९९ चा महा. १०.

विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य होण्यासाठी पात्रतेच्या शर्ती विनिर्दिष्ट करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

" **२२अ.** या अधिनियमाच्या कोणत्याही अन्य तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन, कुलपतींशी विचारविनिमय करून, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी किंवा नामनिर्देशित होण्यासाठी पात्रतेच्या शर्ती, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, विनिर्दिष्ट करील. ".

सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ८५ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८५ मध्ये, पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (२अ) राज्य शासन, त्याला प्राप्त झालेले विद्यापीठाचे लेखापरीक्षा केलेले वार्षिक लेखे, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्याची व्यवस्था करील.".

सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ८६ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८६ ला त्याचा पोट-कलम (१) म्हणून नव्याने क्रमांक देण्यात येईल; आणि अशा नव्याने क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (२) राज्य शासन, त्याला प्राप्त झालेला विद्यापीठाचा वार्षिक अहवाल, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्याची व्यवस्था करील.".

सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ९४ ऐवजी नवीन कलम दाखल करणे.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९४ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

"**९४.** हा अधिनियम, परिनियम, आदेश, विनियम किंवा नियम यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखादा विद्यार्थी, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाच्या निकटपूर्वी आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०१० याच्या प्रारंभाच्या दिनांकास, या अधिनियमाच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही विद्यापीठामध्ये आरोग्य विज्ञानामधील पदवी घेण्यासाठी अभ्यास करीत असल्यास, तो विद्यापीठाचा विद्यार्थी असल्याचे मानण्यात येईल.".

विद्यापीठाचे विशेषाधिकार देण्याकरिता विद्यार्थ्यांना प्रवेश.

२०१० चा महा. अध्या. १४.

## निवेदन

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ (१९९९ चा महा. १०) अन्वये दिनांक ३ जून १९९८ पासून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ स्थापन करण्यात आले आहे. उक्त अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (१७) मध्ये अंतर्भूत असलेल्या "आरोग्य विज्ञान" या संज्ञेच्या व्याख्येनुसार आरोग्य विज्ञानाशी संबंधित असलेले सर्व अभ्यासक्रम, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या अधिकारितेत आणण्यात आले आहेत. तथापि, उक्त अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी, उक्त अधिनियमाच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही विद्यापीठामध्ये (यात यापुढे ज्याचा निर्देश "अनुसूचित विद्यापीठ" असा करण्यात आला आहे) आरोग्य विज्ञानामधील पदवीसाठी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे हित आणि विद्याविषयक कारकीर्द लक्षात घेऊन, अशा विद्यापीठाने घेतलेल्या परीक्षांचे निकाल घोषित करण्यासाठी आणि अशा विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्याचा अधिकार प्रदान करण्यासाठी, उक्त अधिनियमात कलम ९४ अंतर्भूत करणे इष्ट आहे असे शासनास वाटले. उक्त कलम ९४ च्या तरतुदी, मूलतः अनुसूचित विद्यापीठांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना उक्त अधिनियमाच्या प्रारंभानंतर, आरोग्य विज्ञानामधील पदवी प्रदान करण्याकरिता संक्रमक तरतुदी म्हणून अंतर्भूत करण्यात आल्या होत्या तरी त्या बऱ्याच काळापर्यंत, म्हणजेच; बारा वर्षांपेक्षा जास्त कालावधीपर्यंत लागू होत्या, असे दिसून आले आहे. आता, अशा तरतुदी अनिश्चित कालावधीपर्यंत अंमलात असू नयेत असे शासनाला वाटते आणि त्या प्रयोजनासाठी उक्त कलम ९४ मध्ये अधिक स्पष्टपणे तरतुदी अंतर्भूत करण्यात याव्या जेणेकरून उक्त अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वी, अनुसूचित विद्यापीठांमध्ये नाव नोंदविलेल्या आणि जे अजूनपर्यंत अभ्यासक्रम पूर्ण करू शकले नाहीत अशा सर्व विद्यार्थ्यांना, उक्त अधिनियमाच्या कलम ३ अन्वये स्थापन केलेल्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे विद्यार्थी असल्याचे मानण्यात येईल.

२. उक्त अधिनियमाच्या कलम २२ मध्ये, अधिसभा, व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद, विद्याशाखा, नियोजन मंडळ, अभ्यास मंडळ, परीक्षा मंडळ यांवर, आणि उक्त प्राधिकरणाचा सदस्य म्हणून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांवर व्यक्तींना निवडून देण्यासाठी किंवा नामनिर्देशित करण्यासाठी तरतूद आहे. तथापि, उक्त अधिनियमामध्ये विद्यापीठाच्या अशा कोणत्याही प्राधिकरणांचा सदस्य होण्याकरिता कोणत्याही विशिष्ट पात्रतेच्या शर्ती निर्धारित केलेल्या नाहीत. म्हणून, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणांचा सदस्य म्हणून निवडून येण्याकरिता किंवा नामनिर्देशित होण्याकरिता, कुलपतीशी विचारविनिमय करून, पात्रतेच्या शर्ती विनिर्दिष्ट करण्याचा अधिकार शासनाकडे घेण्यासाठी, नवीन कलम २२अ समाविष्ट करता यावे याकरिता, उक्त अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे असे शासनास वाटते. तसेच, शासनाला प्राप्त झालेले महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे वार्षिक लेखे व वार्षिक अहवाल राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवण्यात येतील, अशी तरतूद करणेदेखील इष्ट आहे, असे शासनास वाटते.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ (१९९९ चा महा. १०) यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक ५ ऑक्टोबर २०१०.

**के. शंकरनारायणन्,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मिलींद म्हैसकर,**
शासनाचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.